बुधवार दि.१२ जून २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : २८४
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीस उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 www. lokneta.com

# भाजपाला आता आरएसएसची गरज नाही:नाना पटोलेंचा निशाणा



## नीट परीक्षेत घोटाळा, त्याची सीबीआय चौकशी केली जावी

लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबई (वृत्तसंस्था)

विधान परिषदेच्या चार जागांची निवडणूक एकत्र लढवण्याचा महाविकास आघाडी म्हणून काँग्रेसचा विचार आहे. यासंदर्भात शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याशी संपर्क केला परंतु संपर्क होऊ शकला नाही. अर्ज मागे घेण्यास अजून वेळ असून लवकरच यावर निर्णय होईल, अशी आशा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी व्यक्त केली आहे.

टिळक भवन येथे पत्रकार परिषदेत बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, कोकण, मुंबई व नाशिक पदवीधर व शिक्षक मतदारसंघातून निवडणुका होत आहेत. विधान परिषदेच्या कोकण पदवीधर व नाशिकच्या मतदारसंघातून निवडणूक लढवण्याची भूमिका काँग्रेस पक्षाने जाहीर केली होती. परंतु शिवसेनेने परस्पर कोकण, नाशिक व मुंबई मतदार संघासाठीचे उमेदवार जाहीर केले. विधान परिषद निवडणुकीचा निर्णय एकत्र बसून केल्यास महाविकास आघाडीला लोकसभेप्रमाणे चांगले यश मिळू शकेल यासाठी काँग्रेसचा प्रयत्न आहे. उद्धव ठाकरे यांना संपर्क केला तेव्हा ते परदेशात होते. आज मातोश्रीवर संपर्क करण्याचा प्रयत्न केला पण संपर्क होऊ शकला नाही. अजुनही वेळ गेलेली नाही, चर्चेतून मार्ग निघू शकतो असेही नाना पटोले म्हणाले.नीट परिक्षेत घोटाळा झालेला असून डॉक्टर बनण्याचे लाखो विद्यार्थ्यांचे स्वप्न धुळीस मिळाले आहे. या परिक्षेचे सर्व नियंत्रण केंद्र सरकारकडे असते, ही परीक्षाच भ्रष्टाचाराचे केंद्र बनले आहे. आपला मुलगा डॉक्टर व्हावा यासाठी पालक लाखो रुपये खर्च करतात पण या भ्रष्टाचारामुळे पालक व विद्यार्थ्यांची घोर निराश होत आहे. सर्वसामान्य गरीब कुटुंबातील मुलांनी डॉक्टर होऊ नये हे भाजपाचे षडयंत्र आहे. नीट परीक्षा जुन्याच पद्धतीने घेतली पाहिजे अशी मागणी करत नीट परिक्षेत झालेल्या भ्रष्टाचाराची सीबीआय मार्फत चौकशी करून दोषींना शिक्षा केली पाहिजे असेही नाना पटोले म्हणाले.सरसंघचालक मोहन भागवत यांनी सरकारला दिलेल्या सल्ल्यावर बोलताना नाना पटोले म्हणाले की, भारतीय जनता पक्षाला आता राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची गरज नाही असे भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनीच स्पष्ट केले आहे. त्यामुळे मोहन भागवत यांनी भाजपा सरकारला काहीही सल्ला दिला तरी ते सरकार मानेल असे वाटत नाही, असा टोला नाना पटोले यांनी लगावला.


### वंचित नेते तथा ग्रामपंचायत सदस्य नागवंशी, संघपाल पनाड यांच्या नेतृत्वामध्ये

# अखेर उशिरापर्यंत चाललेले डफडे वाजून रस्ता रोको आंदोलन यशस्वी

लोकनेता न्यूज नेटवर्क

लोणार । विनायक कुटे

लोणार तालुक्यातील सुलतानपूर येथील विविध समस्या बाबत डफडे बजाव व रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.सविस्तर वृत्त असे की वार्ड क्रमांक १ मध्ये १३ लाख रुपये सिमेंट रोड च्या कामाचे भूमिपूजन करून कामाला सुरुवात.. व ईतर मागण्या संदर्भात बाहेरील तालुक्यातील चौकशी समिती नेमून कार्यवाही करण्याचे लेखी आश्वासन देण्यात आले. आंदोलनाच्या मागण्या संदर्भात चर्चा करून सर्व मागण्या मान्य करत. समस्या मार्गी काढण्यासाठी लोणार पंचायत समिती कार्यालयाचे साह्यक गटविकास अधिकारी घुगे साहेब, विस्तार अधिकारी ठोके साहेब, मुंढे साहेब,ग्रामविकास



अधिकारी काव्हरके साहेब, रिंढे साहेब उपस्थित होते.

यावेळी आपला रोष व्यक्त करण्यासाठी हजारो महिला व पुरुषानी आंदोलनामध्ये सहभागी झाले होते. आंदोलन यशस्वी करण्यासाठी युवा नेते अनित्य घेवंदे, शेख अख्तर भाई,मा.सरपंच सलीम शेठ, मा . सरपंच पुरूषोत्तम गाडेकर, डॉ.राम कडूकर,संतोष पाटील, संतोष शिंदे,शे.अमीर भाई,शंकर निलक, सद्दाम भाई,भारत पनाड,अनंथा टकले, असीम भाई,साबेर भाई,रोशन भाई, सम्मद भाई,गजानन जुमडे,अफजल भाई, सुबान भाई,चँदभाई वार्ताहर, मोबिन भाई,अन्सार शाह,वाजीद भाई, जावेद भाई,नामदेव पनाड,मनोहर पनाड, श्रीराम पनाड,बबन पनाड, नागशेन पनाड, अतीष पनाड,गजानन पनाड,महेश मोरे, कळणू जावळे,पारस पनाड,बिंबिसार पनाड, सुनिल शेजूळ,संजय शेजूळ, शिवाजी खोलगडे,राजहंस जावळे,रामा पनाड, आकाश घेवंदे संदेश पनाड, महेंद्र पनाड,भुषण जावळे,अकाश पनाड, अमोल आनंदराव, दिपक आनंदराव सुमनबाई पनाड, (ग्रामपंचायत सदस्य)सिधूबाई पनाड, शोभाबाई घेवंदे,छायाबाई पनाड, केशरबाई गवई, जिजाबाई वाकळे, अलकाबाई पनाड, शांताबाई पनाड, शकुंतलाबाई जावळे ताईबाई पनाड, अस्मिता पनाड उपस्थित होते. आंदोलनामध्ये कुठेही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासनाचे कर्तव्यदक्ष ठाणेदार शिंगटे साहेब व बिट जमादार कटक साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली,जाधव साहेब,रिंढे साहेब, नांगरे साहेब यांनी चोख बंदोबस्त ठेवला.

## खडकत ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी ललित जेवे यांची बिनविरोध निवड



लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । राजू म्हस्के

आष्टी तालुक्यातील खडकत ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी ललित रतिलाल जेवे यांची बिनविरोध निवड झाली आहे.

आ.सुरेश धस यांचे खंदे समर्थक असून आ.धस यांच्या मार्गदर्शनाखाली तर कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती दत्ता भाऊ जेवे यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यातील मोठी ग्रामपंचायत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या खडकत ग्रामपंचायतच्या रिक्त झालेल्या उपसरपंचपदावर ललित जेवे यांची सर्वानुमते मते निवड करण्यात आली आहे. नवनिर्वाचित उपसरपंचपदी ललित जेवे यांची निवड झाल्याबद्दल आ.सुरेश धस,युवा नेते जयदत्त धस, युवा नेते सागर धस यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या तर नवनिर्वाचित उपसरपंच व उपस्थित ग्रामपंचायत सदस्य यांचा कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती दत्ताभाऊ जेवे,अशोक गाडेकर, बाळासाहेब पवार,बाळासाहेब भोष्टे,कल्याण जेवे,निशांत जेवे,संजय जेवे,आदम शेख,राम कसबे,नवनाथ उदमले,निर्मळ सर,पप्पु काळे,बाळू निंबाळकर,तात्या जाधव,बाळू उदमले, प्रभू सूर्यवंशी, सतीश जेवे, राजू परदेशी आदींसह समस्थ ग्रामस्थाच्यावतीने सत्कार करून नवनिर्वाचित उपसरपंच ललित जेवे यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# कास्ट्राईब कर्मचारी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी घेतली इंगळेंची भेट

लोकनेता न्यूज नेटवर्क

कंधार । प्रतिनिधी

कास्ट्राईब कर्मचारी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी कास्ट्राईब कर्मचारी महासंघ, महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष कृष्णा इंगळे यांची नागपूर येथील निवासस्थानी रविवारी, ९ जून रोजी सकाळी ११ वाजता सदिच्छा भेट घेतली.



या भेटीत दिव्यांग विभागात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या समस्यांवर सखोल चर्चा करण्यात आली. त्यात १०, २०, ३० ची वेतनश्रेणी मिळावी, मागासवर्गीय कर्मचारी यांच्यावर होणाऱ्या अन्यायाबाबत, मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या बदली विषयी, मागासवर्गीय कर्मचाऱ्यांबाबत जे शासन निर्णय आहेत. त्यांची अंमलबजावणी होत नसल्याबाबत, महासंघाचे सदस्य वाढविण्याबाबत, मागासवर्गीय कर्मचाऱ्यांचे अधिवेशन घेण्याबाबत, शासन निर्णयानुसार बऱ्याचशा कार्यालयामध्ये मागासवर्गीय कक्ष स्थापन नसल्याबाबत, महासंघाच्या पदाधिकाऱ्यांस वरिष्ठ अधिकारी त्रास देत असल्याबाबत आदी विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी कास्ट्राईब कर्मचारी महासंघाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष विजयकुमार ढवळे (दिव्यांग), कास्ट्राईब कर्मचारी महासंघाचे नागपूर विभागीय अध्यक्ष जालिंदर गजभारे, कास्ट्राईब कर्मचारी महासंघाचे नांदेड जिल्हाध्यक्ष सतिश कदम, कास्ट्राईब कर्मचारी महासंघाचे सचिव छत्रपती गायकवाड आदी उपस्थित होते.

# जिल्हा शल्यचिकीत्सकाने यांची चौकशी करण्याची मागणी

लोकनेता न्यूज नेटवर्क

केज । अमोल सावंत




प्रत्येक वर्षी आरोग्य विभागात उत्कृष्ट काम करणाऱ्या परिचारीकांना फ्लोरेन्स नाईटिंगल पुरस्कार देऊन गौरव केला जातो.या साठी जिल्हा,ग्रामीण,उपजिल्हा रुग्णालयातून परिचारिकांना पुरस्कार दिला जातो. ज्या रुग्णालयात उत्कृष्ट काम केले जाते अश्या परिचारीकाना हा पुरस्कार दिला जातो यांची शिफारस त्या रूगणालयातील वैद्यकीय अधीक्षक परिचारीकांचा वर्ष भराच काम बघून शिफारस देतात त्या नंतर ते कमिटी कडे पाठवतात त्यातून त्या परिचारिकांना पुरस्कार दिला जातो.पण केज रुग्णालयातील वैद्यकीय अधीक्षकांना याचा विसर पडला का काहि वेगळ्याच वैशिष्ट्य पुर्ण गोष्टी कडे दुर्लक्ष करून शिफारस केली.कारण केज उपजिल्हा रुग्णालयात दिवस-रात्र सेवा देणाऱ्या अपघात विभाग,प्रस्तुती विभाग,शस्त्रक्रिया विभाग, लसीकरण विभाग,असे किती तरी विभागात आठ,आठ घंटे काम करणारे अधिपरीचारारिका असताना दिवसात फक्त दोन, तीन घंटे काम करून कधी वार्डात काम न करणाऱ्या परिचारीकांनची शिफारस केली जाते व त्यांना पुरस्कार दिला जातो तो ही एक वेळेस नाहीतर तर दोन दोन वेळेस.गेल्या वर्षी ज्या अधिपरीचारीकांना हा पुरस्कार भेटला त्यानांच पुन्हा या वर्षी वैद्यकीय अधीक्षक शिफारस करतात व त्यांनाच हे पुरस्कार भेटत असल्याने या पुरस्काराकडे संशयाने पाहिले जातआहे वैद्यकीय अधीक्षक जर आपल्या कर्मचाऱ्यांना न्याय देत नसतील तर कर्मचारी कसे प्रोत्साहित होतील असे विकून शिफारशी जर वैद्यकीय अधीक्षक देत असतील तर खरे इमानदारीने आठ घंटे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यावर अन्याय नाही का?केज येथील उपजिल्हा रुग्णालयातील दिलेल्या शिफारसीची आता जिल्हा शल्यचिकीत्सकाने चौकशी करून न्याय द्यावा अशी मागणी आता केज रुग्णालयातील कर्मचारी दबक्या आवाजात चर्चा करत आहेत कारण प्रशासनाच्या विरोधात जायचे तर त्यांच्या हातात वार्षिक गोपिनीय अहवाल असतात.त्यामुळे सहसा कर्मचारी वरिष्ठांच्या पुढे जात नाहीत म्हणूनच वरिष्ठ आपल्या मर्जीतील हुजरेगिरी,कामचुकार लोकांची शिफारस करतात व असे लोक पुरस्कार घेतात.

झाडे लावा झाडे जगवा

## चारोळी

वेड्या मनाला कसे सावरावे
बांध घालूनी कसे आवरावे
नकळत होते वाट वाकडी
पाकळी निसटता कसे बहरावे.

रंजना सानप
मायणी (सातारा)



पंचायत समिती आष्टी तालुक्याचे कर्तव्यदक्ष गटविकास अधिकारी श्री राजेंद्र गर्जे साहेब यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार करताना शिक्षक संघटनेचे बीड जिल्हा माजी अध्यक्ष श्रीमंत सोनवणे,राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक जगन्नाथ सोनवणे,भागवत शेकडे,स्वामी विवेकानंद पंतसंस्था बँकचे उपाध्यक्ष अशोक लटपटे,पुरोगामी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष अध्यक्ष अण्णासाहेब साबळे,चिंचाळा माजी सरपंच डिंगाबर पोकळे दिसत आहेत.(लोकनेता न्यूज नेटवर्क आष्टी:)

दिनांक ११ जून-२०२४ मंगळवार रोजी श्री.शागीर्द अहमद शेख(सर)यांना एकता सेवा भावी संस्था महाराष्ट्र यांच्या वतीने शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल आमदार श्री. वडकुते साहेब, प्रसिद्ध संगीतकार श्री.सुमित सेनजी परभणीचे माजी महापौर प्रतापभैय्या देशमुख, मराठी सिनेमा अभिनेता जयराज नाईक, प्रसिद्ध साहित्यिक श्रीमती संगिता जामगे, मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष श्री. अरुण मराठे, कार्यक्रमाचे संयोजक श्री.अजमत खान व इतर प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत मानाचा महाराष्ट्र गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांचे हार्दिक अभिनंदन व पुढील कार्यास व वाटचालीस हार्दिक शुभेच्छा...!!! (छाया-लोकनेता न्युज नेटवर्क पाटोदा.)



संपादकीय

# ‘केका’वली

लोकनेता न्यूज नेटवर्क

केक ही गोष्ट पंचवीस वर्षांपूर्वी आजच्यासारखी सहज उपलब्ध नव्हती आणि ‘करिअर ऑप्शन’तर नव्हतीच नव्हती. त्या काळाच्या केकची आज उपलब्ध असलेल्या केकशी तुलना केली तर ‘ती माकडापासून माणसाची झालेल्या उत्क्रांती’शीच करावी लागेल. पाव बनवण्याच्या पिठात साखर आणि बटर मिसळून भट्टीत टाकून काढले की जे बनायचे, त्यालाच एकेकाळी केक म्हणत. पण मैदा साखर दूध बटरच्या या भट्टीतील मिश्रणाने केवळ एक ‘पाश्चात्य चविष्ट खाद्यपदार्था’ या ऐवजी ‘कुठल्याही सेलिब्रेशनचा अनिवार्य साथी’ असे रूप धारण कधी केले हे कळलेच नाही.गेल्या तीन दशकांत झालेला हा बदल इतका बेमालूमपणे झाला आहे की केक ही फार दुर्मिळ गोष्ट होती, हे आपण विसरून गेलो आहोत. बटर आणि क्रीमचा वापर केलेला साधा केक आणि त्याचीच दुसरी आवृत्ती ही चॉकलेट केक, असे दोनच प्रकार तेव्हा असायचे. जसजसा केकमधला लोकांचा रस वाढत गेला तसतसे केकने वेगळे रूप धारण करायला सुरुवात केली. केक म्हणजे सपाट गोल किंवा चौकोन आणि इनोव्हेटीव्ह केक म्हणजे ट्युटीफ्रुटी घातलेला, असे थोडे वैविध्य सुरुवातीला आले, पुढे त्याच्या अनेक सुधारित आवृत्त्या येत गेल्या आणि मग ड्रायफ्रुट्सपासून तर अनेक गोष्टींचा अंतर्भाव असण्यापर्यंतची, रंग, रूप, चव, आकार अशी उत्क्रांती त्यात होत गेली. सर्व ठिकाणी, सर्व प्रकारांत आणि अनेक स्वादांत केकने स्वत:ला ‘उपलब्ध’ करून दिले.सुरुवातीला केक म्हणजे मधल्या वेळेत चहासोबत खाण्यासाठीचा स्पंज केक किंवा मावा केक, एवढेच असायचे. त्यानंतर कुटुंब रचना बदलली, दोघे कमवणारे आणि एक मूल असलेले अशी नवी व्यवस्था आली. ‘काट्र्यांची’ लाडकी मुले झाली आणि त्या मुलांच्या वाढदिवसाच्या पार्ट्या होऊ लागल्या. हळदीच्या कार्यक्रमात सुद्धा पांढऱ्यागुलाबी रंगांची पेये रिचवत, लाल हिरव्या रंगाच्या खाण्यांवर ताव मारल्यावर ‘केक कापणे’ कंपल्सरी होऊ लागले.लग्न ठरले, एन्गेजमेंट झाली, लग्न झाले, ती प्रेग्नंट झाली, बाळ झाले, बाळाला घरी आणले, बाळ एक महिन्याचे झाले, वर्षाचे होईल, मुलाच्या बापाचे प्रमोशन झाले, आईची बदली झाली, डायव्होर्स झाला, मूड झाला असे काहीही निमित्त केकला चालते. दहावी, बारावी पास झाला तर विचारायलाच नको. त्यात आता ‘थँक्यू केक’ची भर पडलेली आहे, म्हणजे केवळ बरे वाटावे म्हणून पाठवायचा केक. अलीकडे एका बाईने तिची गाडी उत्तम दुरुस्त केलेल्या मॅकेनिकचे आभार मानण्यासाठी छान केक पाठवला. हल्ली इटुकल्या कुटुंबासाठी लोकप्रिय झालेले छोटे पाव किलोचे ‘बेंटो केक’ अशा प्रसंगांसाठी खूप चालतात.सुरुवातीला एक–दोन रंगातच आणि तितक्याच स्वादात असलेल्या केकने गेल्या काही वर्षांत सगळे रस, गंध आणि स्वाद स्वत:मध्ये ब्लॅक होल प्रमाणे गिळंकृत करायला सुरुवात केली. त्यामध्ये फळांचे स्वाद होते आणि त्यातूनच पायनॅपल केक ही सगळीकडे कधीही मिळणारी केकची श्रेणी तयार झाली. मग फळांच्या स्वरूप आणि ऋतुनुसार त्यात बदल होत राहिले. उदा. या महिन्यांत मँगो केक मिळतो, पण तो सगळीकडे मिळतो असे नाही. त्याचबरोबर या केकने स्वत:त वेगवेगळ्या मिठाया रिचवायला सुरुवात केली. त्यातून गेल्या काही वर्षांत लोकप्रिय झालेले रसमलाई, गुलाबजाम या मिठायांना कौशल्याने स्वत:च्या आत घेतलेले केक निर्माण झाले. यात थ्रीडी प्रिंटिंग तंत्र आल्यानंतर केकला विविध आकार आणि त्यात कल्पक घटक आणणे शक्य व्हायला लागले. मुलांच्या वाढदिवसाला त्याच्या आवडीची चित्रे असलेले केक यायला लागले. मात्र कितीही प्रयोग झाले तरी सर्वाधिक खपणारा केक हा चॉकलेट केकच आहे.वारेमाप आडवे हात मारल्याने आडवे वाढणारे लोक अचानक हेल्थ कॉन्शसच्या जमातीत सामील व्हायल्यावर मग केकचा मुख्य घटक असलेला मैदा बाजूला पडला आणि त्याच्या जागी गव्हाचे पीठ आले. तेही घातक आहे, असे सांगितले जायला लागले, त्यामुळे ग्लुटन फ्री पीठ म्हणून नाचणी, ज्वारी वगैरेची पीठे आली. (हे केक ज्यांनी खाल्ले त्यांचे शंभर अपराध माफ व्हायला हवेत. कारण, चांगला केक खायचा असेल तर मैद्याला पर्याय नाही, हे लक्षात ठेवावे.) याच मालिकेत पुढे उपवासाचा केक आला. यात राजगिरा किंवा शिंगाड्याच्या पिठाचा वापर होतो. हलकेपणासाठी दही, पिकलेली केळी यांचा वापर करून आध्यात्मक शाकाहारी परिणामही साधला जातो.एकेकाळी गॅसवर खाली रेती ठेवून त्याच्या भोवती हे पीठ साखर आणि दुधबटरचे मिश्रण गोल पसरवून भाजून घ्यावे लागायचे. मग तो केक त्यातील प्रमाण आणि प्रक्रियेनुसार मऊसूत वाटीत ‘इडली एवढा नरम’ पासून तर ‘फरशी तोडणाऱ्या दगडासारखा कठीण’ असे कोणतेही रूप तो धारण करायचा. नंतर वेगवेगळ्या प्रकारची ओव्हन्स आली आणि तापमान नियंत्रित करणारी यंत्रे तंत्रे आली. पूर्वी केवळ नवऱ्याच्या वाढदिवशी त्याला खुश करण्यासाठी किंवा मुलांचा वाढदिवस साजरा करण्यापुरती मर्यादित असलेली घरी केक बनवण्याची हौस लॉकडाउनच्या काळात नोकरी गमावलेल्या अनेकांसाठी संसार सावरणारी ठरली. अनेक महिलांना लोणची पापडाच्या पारंपरिक गृहउद्योगाव्यतिरिक्त अधिक ग्लॅमरस कमाईचा पर्याय त्याने दिला. शहराच्या प्रत्येक गल्लीत नवीन केकची दुकाने रेस्तराँच्या वेगात उघडायला लागली. अनेक ठिकाणी आपापल्या पद्धतीची आणि लौकिकाची केकची दुकाने आहेत. प्रत्येकाच्या हातानुसार त्याची चव बदलते. प्रत्येक जण आपली सर्जनशीलता त्याच्यामध्ये आणतो आणि आपल्या पद्धतीने ती लोकप्रिय करतो.पूर्वी केक केवळ खाण्यासाठी असायचा, आता तो लावण्यासाठी पण वापरला जातो. गेल्या पंचवीस वर्षात महत्त्वाची घडामोडी घडली ती म्हणजे कॉर्पोरेट संस्कृतीचे आगमन. त्यातून मुख्यत: पाश्चात्य संस्कृती वेगाने लोकांच्या आयुष्यात शिरली. या कार्पेट कल्चरमध्ये एक एचआर नावाचा प्रकार आला. त्यांनी कर्मचाऱ्यांचे वाढदिवस साजरे करण्यास सुरुवात केली. मग त्यामध्ये दोन केक मागवले जाऊ लागल, एक खाण्यासाठी, एक फासण्यासाठी. ते खूप लोकप्रिय झाले आणि केकची विक्रीही दुप्पट झाल्याने अर्थकारणाला वेग आला. ऑफिसमधली संस्कृती साहजिक घरीही आली. मग घरच्या मंडळींवरही असे प्रयोग सुरू झाले.ॲल्युमिनियम भांड्यांपासून मायक्रोव्हेव, ओटीजी अव्हनपर्यंत त्याचे रूप बदलले आहे. आधीचा केक नुसता ‘असायचा’, आता त्यावर दुनिया ‘वसलेली’ असते. ही कलात्मक मांडणी कधी कधी अविश्वसनीय असते. मात्र असे केक मुख्यत: पाहण्यासाठी असतात. पण केकचा खरा आस्वाद घ्यायचा असेल तर उत्तम रेड वेल्वेट किंवा उत्कृष्ट चीज केक (विथ रासबेरी सॉस ऑफकोर्स) याचा एक मोठा तुकडा घेऊन कोपऱ्यात एकटे बसावे. जसजसा तो चमच्या चमच्याने पोटात जातो, तसतशी आतमध्ये रुतून बसलेली दु:खे आणि जगाबद्दलच्या शिकायती यांची डोळ्यावाटे वाफ बाहेर जाते. पूर्वी केक पोट भरायचे, आता मनात आनंद भरतात.बेकिंग तंत्रात साधने महत्त्वाचीच, तसे त्यांचा वापर करण्याचे कौशल्यही महत्त्वाचे. यात अचूकता महत्त्वाची, अत्यंत काळजीपूर्वक तापमाने बघावी लागतात. काही मागेपुढे झाले तर टेक्श्चर बदलते. अन्य पदार्थांनुसार, मीठ, तिखट टाकून पुन्हा शिजवून, गोडवा आदी बदलता येत नाही. जागतिकीकरणात देशसीमांच्या पलीकडे पसरलेल्या आणि ऑटोमेशनने सगळे सपाट झालेल्या जमान्यात जगभर मिळणाऱ्या केकने आपली स्थानिक आणि खासगी वैशिष्ट्ये टिकवून ठेवली आहेत. याची हीच सुंदर बाजू आहे की, औद्योगिकीकरण, तंत्रज्ञान खूप वेगात वाढलेले असले तरी केक अजूनही माणसाच्या हाताच्या स्पर्शाला भुकेलेली आणि त्याच्या अधीन असलेली कला आहे. ती तंत्र आणि कला याचा संगम आहे. त्याचे औद्योगिकीकरण झालेले नाही. इति ‘केका’वली संपूर्ण.

# जागतिक दृष्टीदान दिवस

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

उदगीर | सय्यद रहीम रजा




अनेक अंध व्यक्तींचे जीवन प्रकाशमय करणारे डॉ. रामचंद्र भालचंद्र यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ साजरा होणारा दृष्टिदान दिवस आज साजरा होत आहे. डोळ्यात दाटलेल्या काळ्याकुट्ट अंधारातून उद्याच्या उज्ज्वल भविष्याची स्वप्ने पाहणाऱ्या व्यक्तींना नेत्रदानाच्या माध्यमातून हे जग सुंदर आहे.याची प्रचिती देण्याची प्रेरणा देणारा हा दिवस आहे. शासकीय सेवेत नेत्रचिकित्सक म्हणून अहोरात्र झटणाऱ्या डॉ. रामचंद्र यांचे नाव महाराष्ट्राच्या इतिहासात अजरामर आहे. त्यांचा जन्म उस्मानाबाद जिल्ह्यात १० जून १९२४ रोजी झाला. कौटुंबिक परिस्थिती खडतर असतानाही जिद्द व चिकाटीच्या बळावर ते कार्यरत राहिले. राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रमांतर्गत नेत्रसंकलनासाठी सुमारे २५० हून अधिक नेत्रपेढ्या कार्यरत आहेत. राज्यातील मृत्यूचे प्रमाण व या पच्छात होणारे नेत्रदान यामध्ये मोठी तफावत आहे. नेत्रदान जनजागृती बाबत विविध शासकीय व अशासकीय संस्था कार्यरत आहेत. यांच्या मार्फत जनजागृती केली जाते. मात्र, याबाबतीत अजूनही म्हणावी तेवढी प्रगती झाली नसल्याचे मत या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या तज्ज्ञांकडून व्यक्त होत आहे. अंधत्व निवारणासाठी अनेक जण पुढे येत आहेत.यातील तांत्रिक अडचणी दूर करणे महत्त्वाचे आहे. ग्रामीण भागात नेत्रदानाविषयी प्रचार आणि प्रसार होणे महत्त्वाचे आहे. शहरातील खासगी व शासकीय रुग्णालयातून याबाबत योग्य प्रकारे जनजागृती झाल्यास ही चळवळ अधिक जोमात होऊ शकते.

आज जागतिक दृष्टीदानाच्या दिवशी नेत्रादानाचा संकल्प करुया, मृत्यू नंतरही हे सुंदर विश्व पाहूया.

जागतिक दृष्टीदान दिनाचं महत्त्व.

जागतिक दृष्टीदान दिनाचं सर्वात महत्त्वाचे उद्दिष्ट म्हणजेच लोकांना नेत्रदानाचं महत्त्व पटवून देणे, आणि नेत्रदानाविषयी जनजागृती करून लोकांना मृत्यूनंतर डोळे दान करण्याची प्रतिज्ञा घेण्यास प्रवृत्त करणे असा आहे.

भारतासह अनेक देशांमध्ये आजही अंधत्व ही मुख्य समस्या आहे. जागतिक आरोग्य संघटनेनुसार कार्निया संबंधित आजार, मोतीबिंदू आणि काचबिंदू नंतर होणाऱ्या दृष्टी हानि आणि अंधत्वच्या मुख्य कारणांपैकी आहे.

डोळ्यांची काळजी कशी घ्यावी. ?

निरोगी आहाराचे सेवन करावं :– आपल्या आहारात हिरव्या पालेभाज्या, अंडी, बीन्स, आणि गाजराचा समावेश जास्तीत जास्त करावा.

धूम्रपान सोडावं :– धूम्रपान केल्यामुळे मोतीबिंदू, ऑप्टिक आणि मज्जातंतूच्या नुकसानासह दृष्टी संबंधित समस्या उद्भवतात.

सनग्लासेस वापरा :– सूर्याच्या थेट प्रकाशापासून वाचण्यासाठी यूव्ही सनग्लासेस वापरणे. हे आपल्या डोळ्यांचा संरक्षणासाठी चांगले आहेत.

टीव्ही बघताना किंवा संगणकावर काम करतांना अँटी ग्लेयर चष्माचा वापर करण्याचा सल्ला दिला जातो.

कमी प्रकाशात वाचू नका :– डोळ्यांच्या त्रासांसाठी हे देखील कारणीभूत असतं.

डोळ्यांचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी नियमाने डोळ्यांची तपासणी करा.

खिडकी किंवा दिव्यांमधून येणार थेट प्रकाश संगणकावर पडू देऊ नये. डोळ्यांवर चकाकी पासून वाचण्याचा प्रयत्न करा. गरज असल्यास अँटी ग्लेयर स्क्रीनचा वापर करा.

उन्हात बाहेर जात असताना सनग्लासेस घाला. सनग्लासेस धोकादायक अल्ट्रा व्हायलेट ’ए’ आणि अल्ट्रा व्हायलेट ’बी’ किरणांना रोखतात.

जर तुम्ही पॉवर लेन्स वापरत असाल तर नक्कीच सनग्लासेस घाला ज्यामुळे णत किरणांचा डोळ्यांना त्रास होणार नाही.

दररोज किमान दोन लिटर पाणी प्यावे ज्यामुळे डोळे आणि त्वचेचा डिहायड्रेट होत नाही.

प्रत्येक अर्ध्या तासाने डोळ्यांना ५–१० मिनिटे विश्रांती देण्यास विसरू नका.

या गोष्टींची जर तुम्ही नीट काळजी घेतली तर तुम्हाला डोळ्यांच्या समस्या उद्भवणार नाहीत. तसेच, तुमचे डोळे निरोगी राहतील.

**अनिल महल्ले**
**उप माहिती कार्यालय उमरखेड**

# युवकांमधील वाढत्या आत्महत्या

लोकनेता न्यूज नेटवर्क



आजच्या बदललेल्या, वेगवान जीवनशैलीत ताणतणाव आणि त्यातून उद्भवणाऱ्या मनोविकारांचे वाढते प्रमाण सर्वसामान्यांच्या मनात धडकी भरवणारे आहे. चिंता, नैराश्य, बायपोलर डिसऑर्डर, स्किझोफ्रेनिया, मादक पदार्थांची व्यसने या सर्व विकारांनी बाधित व्यक्तींची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. या मानसिक विकारांच्या जंजाळातून उद्भवणाऱ्या आत्महत्या हा सामाजिक चिंतेचा विषय बनला आहे. संगणक आणि मोबाइल तंत्रज्ञानाचे फायदे युवा पिढीला होत आहेत; पण त्याचीच दुसरी दुर्दैवी बाजू म्हणजे, या तांत्रिक प्रगतीतून जन्माला येणारे मनोविकार आणि आत्महत्या युवकांमध्ये मोठ्या प्रमाणात आढळत आहेत.

गेल्या काही वर्षांतील भारतीय तरुणांच्या आत्महत्यांची आकडेवारी आणि त्यामागील कारणे पाहिल्यास अनेक गोष्टी स्पष्ट होतात. सन २०१४ ते २०२१ या सात वर्षांत पुरुषांनी आत्महत्या करण्याच्या घटनांमध्ये २५ टक्क्यांनी वाढ झाली, असा दावा ‘द लॅन्सेट’ या वैद्यकीय नियतकालिकाच्या, ‘रिजनल हेल्थ’च्या अहवालात करण्यात आला होता. सन २०१४मध्ये ४२,५२१ महिलांनी, तर ८९,१२१ पुरुषांनी आत्महत्या केली. सन २०२१मध्ये हे प्रमाण २.६४ पटीने वाढले. त्या वर्षी ४५.०२६ महिलांनी, तर १,१८,९७९ पुरुषांनी आत्महत्या केल्या.

ट्रेंड आणि आकडेवारी

सन २०२४मध्ये आयोजित केलेल्या ‘स्कोपिंग रिव्ह्यू’मध्ये भारतीय किशोरवयीन आणि तरुण मुला–मुलींमधील आत्महत्येच्या पद्धती व जोखीम घटक तपासले गेले. त्यातील प्रमुख निष्कर्षांनुसार :

अलीकडे किशोरवयीन मुलांमध्ये आत्महत्येचे प्रमाण चिंताजनक वाढले आहे. गळफास लावून घेणे आणि विषारी पदार्थ घेणे या पद्धती किशोरवयीन मुले सर्वाधिक वापरतात.

भारतीय तरुणांमध्ये सर्वांत जास्त प्रमाणात नोंदवलेल्या गेलेल्या जोखीम घटकांची टक्केवारी काळजी निर्माण करणारी वाटते.

१. मानसिक आरोग्य समस्या (५४.२८ टक्के) : यामध्ये चिंताविकार, नैराश्य आणि व्यसनांचा समावेश होता.

२. नकारात्मक किंवा क्लेशदायक कौटुंबिक समस्या (३४.२८ टक्के) : जीवनशैलीतील बदलांमुळे कुटुंबांच्या दैनंदिन जीवनात बदल झाले आहेत. आई–वडिलांचे एकमेकांशी असणारे संबंध, संभाषणे आणि कलह नकारात्मकतेच्या दिशेने प्रवास करू लागले आहेत. मुलांना दिला जाणारा वेळ घटतो आहे. त्यांच्यावर मूलभूत संस्कार अभावानेच केले जात आहेत आणि मुलांना सामाजिक वर्तणुकीची जाणीव करून देण्याबाबतची जबाबदारी नाहीशी होत आहे. पालकांच्या आर्थिक, मानसिक आणि सामाजिक समस्यांचे, असंस्कृत वर्तणुकीचे क्लेशकारक अनुभव मुलांना अधिक जाणवत आहेत.

३. शैक्षणिक ताण (२२.८५ टक्के) : शालेय आणि महाविद्यालयीन पातळीवरील शैक्षणिक ताण खूप वाढतो आहे. पदव्युत्तर शिक्षणासाठी, तसेच सरकारी नोकऱ्यांसाठीच्या स्पर्धा परीक्षा मुलांवर असह्य ताण निर्माण करतात.

४. सामाजिक/जीवनशैली घटक (२० टक्के) : पाश्चात्त्य जीवनशैलीचे अनुकरण करण्याची इच्छा; विशेषत: महागडी उपकरणे, वस्त्रे, फॅशनच्या अंतर्गत येणाऱ्या गोष्टी, स्त्री–पुरुष संबंध, इच्छेनुसार न मिळाल्यामुळे किंवा त्यात मनाला त्रास देणाऱ्या घटना घडल्यामुळे होणाऱ्या आत्महत्या.

५. हिंसा (२२.८५ टक्के) : कौटुंबिक हिंसाचार, पालकांचे एकमेकांमधील हिंसक वाद, मुलांना होणारी मारहाण, शेजारी किंवा मित्रांकडून होणारी शाब्दिक आणि शारीरिक हिंसा, मुला–मुलींवर होणारे लैंगिक अत्याचार हे घटक यामध्ये प्रामुख्याने येतात.

६. आर्थिक संकट (८.७५ टक्के) : पालकांवर उद्भवणारी आर्थिक संकटे, युवकांचे वैयक्तिक सबंध, इंटरनेट; तसेच सोशल मीडियातून मिळणारी आभासी प्रलोभने आणि त्यातून उद्भवणारी आर्थिक संकटे.

७. नातेसंबंध (८.७५ टक्के) : घटत चाललेले कौटुंबिक आणि नातेसंबंध, मैत्री, प्रेमप्रकरणातील निराशा हे सारे ‘रिलेशनशिप’बाबतचे प्रश्न, हा एक महत्त्वाचा घटक आज झपाट्याने वाढत चालला आहे.

शैक्षणिक दबाव हे भारतीय तरुणांना आत्महत्येसाठी प्रवृत्त करणारे महत्त्वाचे कारण आहे. एका सर्वेक्षणात, १५–२५ वर्षे वयोगटातील ६५ टक्के युवकांनी शैक्षणिक ताणतणाव, पालकांच्या अपेक्षा, अपयश आणि नातेसंबंधातील समस्यांमुळे आत्महत्या केल्याची नोंद केली गेली आहे. सन २०२१मध्ये १८ ते ३० वर्षे वयोगटातील ५६,५४३ व्यक्तींनी आत्महत्या केल्या. यामध्ये ७१४ युवकांमध्ये परीक्षेत अयशस्वी होणे, हे आत्महत्येचे कारण आढळले.

प्रतिबंधात्मक उपायांची गरज

या निष्कर्षांमधून, नेमकी कारणे शोधून, युवकांमधील आत्महत्यांबाबत प्रतिबंधक उपायांची गरज अधोरेखित होते. मानसिक आरोग्याचा पाठपुरावा, जागरूकता शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावर होणे गरजेचेच आहे. टेलिव्हिजन, चित्रपट, संगणक आणि मोबाइलमधून निर्माण होणाऱ्या आभासी जगाचे परिणाम मुलांवर होण्याआधीच कसे रोखता येतील याचा विचार; त्याबाबतच्या योजना राष्ट्रीय स्तरावर कार्यान्वित करणे महत्त्वाचे ठरते. मानसिक आरोग्याला सामाजिक गरज म्हणून प्राधान्य दिले पाहिजे. घरातील किशोरांसाठी, तरुणांसाठी पोषक वातावरण हवे. प्रत्येक भारतीयाने एक गोष्ट लक्षात ठेवायला हवी, ती म्हणजे व्यावसायिक मदत घेणे आणि मानसिक समस्यांसाठी असलेली अधिकृत हेल्पलाइन वापरणे. यामुळे अनेक संभाव्य घटना आधीच लक्षात येऊ शकतात. स्वत:च्या किंवा ओळखीच्या कुणाच्याही आयुष्यात मानसिक समस्या असल्यास मनोविकारतज्ज्ञांची, प्रमाणित व्यावसायिकांची मदत घ्यायला टाळाटाळ करू नका.

# अमानवीय ग्रंथ : मनुस्मृती

लोकनेता न्यूज नेटवर्क

सद्या महाराष्ट्र राज्याच्या शाळेतील अभ्यासक्रमात मनुस्मृतितील काही श्लोक ठेवण्याच्या वेगवान हालचाली सुरू झाल्या आहेत. त्याला विरोध म्हणून सद्ध्या राज्य ढवळून निघाले आहे. म्हणून मी लायब्ररीतून सार्थ श्रीमनुस्मृती हे पुस्तक काढले आणि चाळले. तर खरेच त्यातून अमानवीय दर्प आला. विषमतेची शेंडी त्यात दिसली. आणि ब्राह्मण वगळून इतर सर्व मानवांवर जाणव्याने करकचून अजगरमिठी मारलेली दिसली. मनुस्मृती ब्राह्मणांना एवढी प्रिय का आहे? असा प्रश्न मला पडला तेंव्हा, या ग्रंथात नमूद अध्याय आणि श्लोक हे सर्व मानवांसाठी एक नाहीत आणि समान पण नाहीत. सारखे नाहीत. त्यात टोकाचा दुजाभाव टाचून भरलेला आहे. लिंगभेद, अर्थभेद, शिक्षणभेद, मानवद्वेष, घृणा, मत्सर पानापानावर भरलेला आहे. मनुस्मृतीत फक्त ब्राह्मण श्रेष्ठत्वं आहे. बाकी सर्व लोकं हे गुलाम, शूद्र, अतिशूद्र, निच आहेत. म्हणून मनुस्मृती हा ग्रंथ लिहील्या गेला. येथील तमाम हिंदूंना, दलित, भटके, विमुक्तांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यासाठी. अर्थार्जनापासून वंचित ठेवण्यासाठी. त्यांची सामाजिक पत पतित बनविण्यासाठी. त्यांना हिन दर्जा देण्यासाठी. अधिकारहिन बनवण्यासाठी. मनुस्मृती हा धार्मिक ग्रंथ नाही, तर हा एक कायदा आहे. ब्राह्मणांना श्रेष्ठत्वं बहाल करणारा. त्यांचे संरक्षण करणारा. त्यांचे सत्ताश्रेष्ठत्वं अबाधित ठेवणारा. हा कायदा ब्राह्मण सोडून इतर सर्वांना भयंकर दंडीत करणारा आहे, टोकाची शिक्षा नमूद करणारा ग्रंथ आहे. मनुस्मृतीत मुली – स्त्रिया बद्दलही अत्यंत हीन पातळीवरचे लिहीलेले आहे निश्चितच ते मुली स्त्रियांबद्दल निषेधार्ह असे लिखान आहे. जसे की,

१) अध्याय ९ श्लोक ९३ तीस वर्षाच्या पुरूषाने बारा वर्षाच्या मनोहर कन्येशी विवाह करावा. पान नं. २५१.

२) अध्याय ९ श्लोक १७ श्रृती व स्मृती ही धर्माची प्रमाणं असून त्यांचा स्त्रियांस अधिकार नसल्यामुळे त्या धर्मज्ञ नसतात. पान. नं. २४०

३) अध्याय ९ श्लोक १८ व्याभिचार हा स्त्रियांचा स्वभावच आहे. पान नं. २४१

४) अध्याय ९ श्लोक १४ पुरूषास पाहताच संभोगाविषयी अभिलाषा उत्पन्न होणे हा त्यांचा स्वभाव आहे. त्यांचे चित्त स्थिर नाही. त्या स्वभावत: स्नेहशून्य आहेत. पान. नं. २४० ई. ई. अजून किती अध्याय आणि किती श्लोक वाचावेत? शि... शि... थू... थू.... म्हणून तर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मनुस्मृती जाहीररित्या जाळली. ती तमाम हिंदू, दलित, आदिवासी, ओबीसी – बहुजन, भटके – विमूक्त ई. जातीत बंदिस्त लोकांना मोकळा श्वास घेता यावा म्हणून. त्यांना शिक्षणाची दारे उघडावीत म्हणूनच. त्यांना अर्थार्जन करता यावे म्हणून. त्यांना समाजात प्रतिष्ठा लाभावी, दर्जा, मान, सन्मान लाभावा म्हणून. महात्मा फुले यांनी ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर अशी मांडणी करून ब्राह्मणांच्या धार्मिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक वर्चस्वाचा जो सार मांडला आहे, तो मनुस्मृतीच्या अधर्म पायावरतीच उभा केलेला आहे, हे ओळखूनच त्यांनी आपल्या विचार कृतीतून सर्वांना जागृत करण्याचा प्रयत्न केलेला आहे. छत्रपती शाहूमहाराज, सयाजीराव गायकवाड महाराज, विवेकानंद, आगरकर ई. नी जे विचार आणि कृती आपल्यासमोर मांडलेली आहे, ती मानवतावादी आहे. समतावादी आहे. हा ग्रंथ ब्राह्मणांच्या सर्वांगीण कल्याणाचा आहे. परंतू तमाम हिंदूंच्या र्हासास कारणीभूत आहे, एवढे तरी हिंदूंनी ओळखून आता आपल्याच हातून आपल्या पायावर विषमतेची अन्याय, अत्याचाराची कुऱ्हाड मारून घेणे थांबवावे. आणि मनुस्मृती, स्मृती, सूक्ते, ऋचा, अठरा पुराणं, चार वेद, भगवद्गीता, रामायण, महाभारत, ई. ग्रंथात सुधारणा घडवून आणण्यास पुढाकार घेतला पाहीजे नाही तर मग शब्दात व्यक्त करता येणार नाही एवढी अश्लीलता यज्ञसंस्थेतील निरर्थकता, त्याचबरोबर अश्वमेधासारख्या यज्ञातील स्त्रिवर्गाची अवहेलना करणारे कृती कार्यक्रम येथून पुढे समाजात सुरू व्हायला वेळ लागणार नाही. अश्वमेधयज्ञात अतिशय घाणेरडे, अश्लिल मंत्र म्हटले म्हणून अश्वमेधयज्ञ विरोधी कृती समितीने दाखल केलेल्या याचिकेची सुनावणी झाली असता, मा. उच्च न्यायालयाने अश्वमेधातील त्या मंत्रावर बंदी घातली. संदर्भ – रूपांतर लेखिका डॉ. रूपा कुलकर्णी बोधी पान नं. ११४. त्याचबरोबर सच्ची रामायण या पुस्तिकेवर उत्तर प्रदेश सरकारने घातलेली बंदी मा. सर्वोच्च न्यायालयाने उठवलेली आहे. म्हणून सच्ची रामायण काय आहे? हे तमाम हिंदूंनी वाचून भानावर आले पाहीजे. विवेकवादी बनले पाहीजे. त्याचबरोबर छत्रपती शिवाजीमहाराज यांचा गुरू रामदास स्वामी नाही, हा मा. उच्च न्यायालयाचा निकाल सुद्धा तमाम हिंदूंनी वाचलाच पाहीजे. अशाप्रकारे हे धर्मग्रंथ, कृती आणि त्यातील विचार जर मानवतेचे गुन्हेगार ठरत असतील, कायद्यापुढे अधर्म ठरत असतील, देशाप्रती विषमतावादी ठरत असतील, मानवा मानवात, धर्मा धर्मात भेदभाव निर्माण करीत असतील, तर निश्चितच मनुस्मृतीसह इतर ही सर्व ग्रंथ समाजातून हद्दपार केली पाहीजेत. मानवांपासून दूर सारली पाहीजेत. कारण असे ग्रंथ हे कायद्यापुढे गुन्हेगार आहेत. यांची जागा तिहार जेल, नाशिक सेन्ट्रल जेल, हर्सूल जेल, येरवडा जेल ई. ठिकाणी असली पाहीजे. अशा विषमतावादी, अन्याय कारक, अत्याचारी, स्त्री – पूरूष भेद करणाऱ्या, उच निचता मानणाऱ्या, वर्णाधिष्ठीत व्यवस्थेत जातीने आणि धर्माने श्रेष्ठ – शूद्र, अतिशूद्र मानणाऱ्या ग्रंथांना घरात, कुटूंबात, समाजात, राज्यात आणि देशात ठेवता कामा नये.

**ॲड. सुभाष सावंगीकर.**
**मो. ९३२५२०९४९२.**

# हिंदू जननायक राजसाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त त्रिदीनी हरिनाम सप्ताहाचे काल्याच्या किर्तनाने सांगता

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

आष्टी शहरातील सायकड गल्लीत जगदंबा देवी मंदिर आवारात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्यावतीने हिंदू जननायक राजसाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त दि.९ ते ११ जुन २०२४ या कालावधीत तीन दिवसांचा त्रिदिनी अखंड हरिनाम सप्ताह आयोजित करण्यात आला.या धार्मिक कार्यक्रमाचा लाभ आष्टी शहरातील परिसरातील भाविकांनी घेतला असे मनसे शेतकरी सेनेचे जिल्हाध्यक्ष कैलास दरेकर यांनी सांगितले आहे या सप्ताहात काकडा भजन,विष्णू सहस्त्रनाम, गीतापाठ पसायदान,ज्ञानेश्वरी पारायण,हरिपाठ,हरिकीर्तन, जागर (संगीत भजन) आदि धार्मिक कार्यक्रम झाले आहेत.रविवार दि.९ जून रोजी रात्री ९ ते ११ ह.भ.प.शिवाजी महाराज कोकणे (चिखली),सोमवार दि.१० जून रोजी रात्री ह.भ.प.रामकृष्ण रंधवे वायु (गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड),मंगळवार दि. ११ जून २०२४ रोजी सकाळी ९ ते ११ यावेळेत विनोदाचार्य ह.भ.प. पांडुरंग महाराज उगले यांचे काल्याचे कीर्तन झाले आहे.नंतर हजारो लोकांना हिंदूजनायक मा.राजसाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्रात पहिल्यांदाच मोठ्या प्रमाणात अशा आगळ्यावेगळ्या कार्यक्रमात महाप्रसाद लाभ भाविकांनी घेतला.यावेळी सप्ताहात व्यासपीठ चालक म्हणुन ह.भ.प.रामदास महाराज डोरले (नाना), ह.भ.प. आसाराम महाराज डोमकावळे,मृदंगाचार्य:- ह.भ.प.रविंद्रमहाराज तवले, ह.भ.प.समाधान महाराज शिंदे,काकडा भजन सर्व भजनी मंडळ,खासबाग,आदित्य धोंडे, योगेश धोंडे गायनाचार्य ह.भ.प.गोपीनाथ पोकळे, ह.भ.प.बबन महाराज बळे,ह.भ.प.सुरेश महाराज डोमकावळे,ह.भ.प.नानासाहेब तवले विणेकरी पोपट धोंडे ह.भ.प.मुकुंद महाराज बुरांडे, ह.भ.प. लालासाहेब महाराज राक्षे ह.भ.प.किसन महाराज जगताप,ह.भ.प.शिवदास महाराज केरूळकर,दत्तात्रय सायकड पंत,किशोर डोमकावळे,यांची साथसंगत लाभलीआहे.या सप्ताहाचे आयोजन कैलास दरेकर शेतकरी सेना जिल्हाध्यक्ष महाराष्ट्र नवनिर्माण सेना, जगदंबा तरूण मंडळ बाबासाहेब दिंडे (तालुकाध्यक्ष,आष्टी), सतिश शिंदे (जिल्हा उपाध्यक्ष), शेतकरी सेना), सुनिल पाचपुते (तालुका उपाध्यक्ष,आष्टी),तुषार चव्हाण (तालुकाध्यक्ष, शिरूर शेतकरी सेना),मच्छिंद्र गर्जे (तालुका उपाध्यक्ष),लहु भवर रामराजे काळे,किशोर डोमकावळे,लक्ष्मण टकले विशाल पांनसांडे,व जगदंबा तरूण मंडळाचे विशेष सहकार्य या उत्सवाला लाभले अखंड हरिनाम सप्ताहाचे होत राहील असं मनसेचे कैलास दरेकर यांनी सांगितले.



# भारतीय दलित महासंघाचे संस्थापक अध्यक्ष सुनील उमाप यांच्या हस्ते नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहिर

## विजय शेलार यांची जिल्हा अध्यक्षपदी निवड





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

भारतीय दलित महासंघाच्या वतीने शहरातील शासकीय विश्रामगृह याठिकाणी बैठक पार पडली या बैठकीमध्ये जिल्हा कार्यकारणी पदाधिकाऱ्यांच्या निवडी पार पडले आहेत बैठकीच्या अध्यक्षस्थानी भारतीय दलित महासंघाचे संस्थापक अध्यक्ष सुनील उमाप उपस्थित होते...बैठकीमध्ये जिल्हा कार्यकारणी जाहीर करण्यात आली आसुन जिल्हाध्यक्षपदी विजय शेलार यांची निवड करण्यात आली... जिल्हा उपाध्यक्ष म्हणून साहेबराव काते यांची निवड करण्यात आली तसेच कार्याध्यक्ष पंडित खुडे, महिला उत्तर नगर जिल्हाध्यक्षा हिना उबाळे तर दक्षिण महिला जिल्हाध्यक्ष कमल जगधने यांची निवड करण्यात आली...पाथर्डी तालुका अध्यक्षपदी विठ्ठल शिरसाट,श्रीरामपूर तालुकाध्यक्ष दिपक भांड यांसह संपूर्ण जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांच्या निवडी या बैठकीमध्ये भारतीय दलित महासंघाच्या वतीने करण्यात आले आहे...बैठक संपल्यानंतर संस्थापक अध्यक्ष सुनील उमाप यांच्या हस्ते नूतन पदाधिकाऱ्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला...भारतीय दलित महासंघ इथून पुढे अन्याय अत्याचारविरोधात पूर्ण ताकतीने काम करणार आसुन समाजाला न्याय मिळवून देण्याचे काम करणार असल्याचा मानस नूतन पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.यावेळी संपूर्ण जिल्हा कार्यकारणी पदाधिकारी आणि भारतीय दलित महासंघ पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.


# जामखेड जवळील खर्डा रोड वरील पेट्रोल पंपाजवळ बस आणि चारचाकी वाहनाचा भिषण अपघात

## आनखी एका युवकाचा उपचारादरम्यान मृत्यू;अपघातातील मृतांची संख्या झाली तीन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

जामखेड खर्डा रोडवरील दि.११ जून रोजी झालेल्या अपघातातील तिसरा गंभीर जखमी झालेल्या मयुर संतोष कोळी या युवकाचा खाजगी रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे.त्यामुळे या अपघातातील मृतांची संख्या ही तीन झाली आहे.याबाबत अधिक माहिती अशी की जामखेड जवळील खर्डा रोडवरील पेट्रोल पंपाजवळ १० जुन रोजी रात्री बस आणि चारचाकी वाहनाचा भिषण अपघात झाला होता.या अपघातात देवदर्शनहून परतणाऱ्या चार चाकी वाहनातील दोघांचा मृत्यू झाला होता तर तिघांवर अहमदनगर येथील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते.या मध्ये मयुर संतोष कोळी या युवकाच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली



असल्याने त्यांच्यावर अहमदनगर येथील खाजगी रुग्णालयात उपचार चालू होते.मात्र मंगळवार दि.११ जुन रोजी सकाळी उपचारादरम्यान रुग्णालयात मयुर संतोष कोळी वय १८ वर्षे रा.वडगाव गुप्ता ता.नगर या युवकाचा मृत्यू झाला.त्यामुळे या अपघातातील मृतांची संख्या ही तीन झाली आहे.

# पीक कर्ज वसुलीसाठी शेतकऱ्यांच्या बचत खात्यावर लावलेले होल्ड तात्काळ काढा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पैठण । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांनी शेतीसाठी राष्ट्रीयकृत बँकेकडून घेतलेले पिक कर्ज थकीत रक्कम वसुलीसाठी स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र, बँक ऑफ बडोदा, इ शाखेकडून शेतकऱ्यांना सक्ती केली जात असून बँकतील शेतकऱ्यांच्या सेव्हींग खात्यांना होल्ड लावले आहे. बँकेकडून होत असलेल्या या अडवणूकीमुळे शेतकऱ्यांना बँकेच्या खात्यावरुन व्यवहार करण्यासाठी अडचणी येत आहे. बँकेच्या अडवणूकीच्या धोरणामुळे ऐन खरीप हंगामाची तयारी करीत असतांनाच शेतकऱ्यांचे व्यवहार ठप्प पडल्याने शेतकऱ्यांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.

याबाबत माहीती अशी की, तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी शेतीसाठी राष्ट्रीयकृत बँकेतून पिक कर्ज घेतलेले आहे. गेल्या काही वर्षापासून तालुक्यात अतिवृष्टी व अत्यल्प पावसामुळे दुष्काळ पडल्याने तालुक्यातील शेतकरी वर्ग मोठ्या आर्थिक संकटात सापडलेले आहेत. अशा बिकट परिस्थितीत बँकेकडून शेतकऱ्यांना ऐन खरीप हंगामाची लागवड कशी करावी या विवंचनेत असलेल्या शेतकऱ्यांना बँकेकडून पिककर्जाची थकीत रक्कम भरण्याची सक्ती केली जात असल्याचा प्रकार समोर येत आहे. शेतकऱ्यांनी पिककर्जाची थकीत रक्कम भरावी यासाठी बँकच्या अधिकाऱ्यांकडून शेतकऱ्यांचे बॅकेत असलेले खाते होल्ड करुन शेतकऱ्यांची अडवणूक केली जात आहे. गेल्या वर्षी तालुक्यात अल्प पावसामुळे दुष्काळाची परिस्थिती होती. दुष्काळाची परिस्थिती असल्याने पाठपुरावा करुन शासनाकडून तालुक्यात दुष्काळ सदृश्य परिस्थिती जाहिर करुन घेतली होती. दुष्काळ सदृश्य परिस्थिती जाहिर झाल्याने तालुक्यात विविध सवलती जाहीर करण्यात आल्या आहेत. यात शेतकऱ्यांच्या घेतलेल्या पिककर्जांच्या वसुलीला स्थगिती देऊन शेतकऱ्यांच्या कर्जाचे पुर्नगठन करावे असे आदेश दिलेले आहेत. शासनाच्या आदेशाला केराची टोपली दाखवत स्टेट बँकेचे अधिकारी मात्र पिक कर्जाची वसुली करण्यासाठी शेतकऱ्यांकडे तगादा लावत आहे. बँकेने अनेक शेतकऱ्यांचे खाते विनासुचना अचानक होल्डवर ठेवले आहे. बँकेच्या या शेतकरी विरोधी धोरणाचा फटका अनेकांना बसला आहे. याबाबत बँकत चौकशी करणाऱ्या शेतकऱ्यांना पिक कर्जाची थकीत रक्कम भरल्याशिवाय खाते अनहोल्ड केले जाणार नाही असे उत्तर बँकेच्या अधिकाऱ्यांकडून दिले जात आहे. बँकेच्या या अडेलतट्टू धोरणामुळे आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांचे सर्व व्यवहार ठप्प झाले असून बँकेच्या या कारभाराची चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी छावा संघटनेचे अनिल राऊत यांनी तहसीलदार यांच्याकडे केली आहे व शेतकऱ्यांचे खाते अनहॉल्ड न केल्यास तीव्र स्वरूपाचे आंदोलनाचा इशारा यावेळी देण्यात आला आहे.यावेळी उपस्थित प्रदेश सरचिटणीस अनिल राऊत, मराठवाडा सचिव भगवान सोरमारे, ड. उद्धव नजन, ड. कल्याण बाबर, ज्ञानेश्वर तांगडे, सचिन गवारे, भाऊराव धरम, कृष्णा काळे, ज्ञानेश्वर घोरपडे आदी उपस्थित होते.





## नगर परिषद देऊळगाव राजा, जिल्हा बुलडाणा

## जाहीर सूचना

**नवीन सेप्टिक टैंक बांधकामाबाबत बांधकाम निर्देशनाचे पालन करणेबाबत.**

(New Septic Tank design criteria  Construction as per-IS2470 Part I  Part II)

नगर परिषद देऊळगाव राजा हद्दीतील सर्व मालमत्ताधारकांना सूचित करण्यात येते की, देऊळगाव राजा शहरात नव्याने बांधकाम सुरु असलेले घरकुल, शौचालयांचे सुरू असलेले किंवा नव्याने बांधकाम करावयाचे असल्यास त्याकरिता सेप्टिक टैंक बांधकामाची संरचना (Septic Tanks design criteria  construction) शासनाचे निर्देशित केल्याप्रमाणे बांधकाम मंजुरीनुसार (IS 2470 part I  part II design) प्रमाणे बांधकाम करणे बंधनकारक करण्यात येत आहे. Indian standard code of paractice for installation of sept tank चीन देऊळगाव राजा कार्यालयात उपलब्ध आहे व खड २४७० वशीळसप विषयी तांत्रिक सहाय्य व इतर आवश्यक माहितीकरिता खालील क्रमांकावर संपर्क साधावा. नियमाचे पालन न केल्यास नगर परिषद देऊळगाव राजा द्वारा दंडात्मक कार्यवाहीं तथा सदर बांधकाम अनधिकृत घोषित करून त्याबाबत कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी

| | | |
|---|---|---|
| १. | (Septic Tank) IS: 2470 Design करीता तांत्रिक सहाय्य करिता | नगर रचना विभाग |
| २. | याबाबत तक्रार किंवा इतर आवश्यक माहितीकरीता | स्वच्छता अभियंता |

स्वा/-
मुख्याधिकारी तथा प्रशासक
नगर परिषद, देऊळगाव राजा

जा. क्र./आवि/नपादे/७६/२०२४ दि. २१/०३/२०२४



## नगर परिषद देऊळगाव राजा, जिल्हा बुलढाणा

## RS- order

नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या निर्देशानुसार राज्यातील सर्व नागरी क्षेत्रात संबंधित शहरातील जलनिःस्सारण वाहिन्याची/मल व जलनिःस्सारण प्रक्रिया केंद्राची/गटारी/नाल्याची सफाई करताना अथवा सेप्टिक टैंक तसेच STP/FSTP प्लांट्स ची देखभाल व दुरूस्ती/सफाई करताना कर्मचाऱ्यांना अपघात झाल्यास त्यांना तातडीची मदत पोहचण्यासाठी राज्यातील सर्व नगर परिषद क्षेत्रामध्ये मुख्याधिकारी यांच्या देखरेखीखाली Responsible Sanitation Authority (RSA) ची स्थापना करण्यात यावी.

यानुसार संदर्भिय क्र.१ Advisory of Mhoua मध्ये नमूद प्रपत्रानुसार देऊळगाव राजा रेल्वे नगर परिषद क्षेत्राकरिता खालील प्रमाणे Responsible Sanitation Authority (RSA) ची स्थापन करण्यात येत आहे.

| Sr. | Name of RSA | Contact no. | Designation |
|---|---|---|---|
| 1. | श्री.अरुण मोकल | 9284517792 | मुख्याधिकारी |
| 2. | श्री.विशाल वाघ | 9834446982 | नोडल अधिकारी/ स्वच्छता निरीक्षक |

# स्व.लक्ष्मीकांत हलकीकर यांनी तत्त्वाशी कधीही तडजोड केली नाही-भारत सातपुते

## उदगीरात बस्वराज पैके यांना स्व. हलकीकर स्मृती पुरस्कार प्रदान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उदगीर । सुनिल बस्वराज हावा**

चाळीस वर्षांपूर्वी निलंगा सारख्या ग्रामीण भागात पत्रकारिता करत असताना ज्येष्ठ पत्रकार स्व. लक्ष्मीकांत हलकीकर यांनी कधीही तत्त्वाशी तडजोड केली नाही. मूल्य निष्ठा सांभाळून पत्रकारिता करीत असताना त्यांनी सामान्य माणसाला न्याय देण्याचा प्रयत्न केला असल्याचे मत प्रसिद्ध वात्रटिकाकार भारत सातपुते यांनी व्यक्त केले.

ज्येष्ठ पत्रकार स्व. लक्ष्मीकांत हलकीकर स्मृती सेवागौरव पुरस्काराने उदगीर येथील श्री शंकरलिंग महाराज मठात आयोजित कार्यक्रमात लातूर येथील समाजसेवक बस्वराज पैके यांना ज्येष्ठ साहित्यिक तथा वात्रटिकाकार भारत सातपुते यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राहुल केंद्रे होते. व्यासपीठावर पुरस्कार प्राप्त बसवराज पैके, माजी नगराध्यक्ष बस्वराज बागबंदे, ज्येष्ठ समाजसेवक डॉ. आर. एन. लखोटीया, खरेदी विक्री संघाचे चेअरमन भरत चामले, दक्षिण मध्य रेल्वे बोर्डाचे सल्लागार समिती सदस्य मोतीलाल डोईजोडे, संयोजक विशाल हलकीकर, विक्रम हलकीकर यांची उपस्थिती होती.

प्रारंभी कार्यक्रमाचे प्रास्ताविक विक्रम हलकीकर यांनी केले.यावेळी बोलताना भारत सातपुते यांनी प्रत्येकाने आपण ज्या क्षेत्रात काम करीत आहोत त्या क्षेत्रात प्रामाणिकपणे काम केले पाहिजे तरच स्वराज्याचे रूपांतर सुराज्यात होणार असल्याचे सांगितले. स्व. लक्ष्मीकांत हलकीकर यांनी त्या काळात आजच्या सारखी डिजिटल पत्रकारिता नसतानाही समाजाच्या कल्याणासाठी पत्रकार म्हणून मोलाची भूमिका बजावली असल्याचे सांगत त्यानीच समाजातील चांगल्या लोकांच्या पाठीशी राहण्याचे काम केले असल्याचे सांगितले. बस्वराज पैके हे स्वतः दिव्यांग असताना आपल्याला जे हाल सोसावे लागत आहेत ते इतर दिव्यांगाच्या नशिबी येऊ नयेत म्हणून ज्या पद्धतीने काम करीत आहेत ते इतरांसाठी प्रेरणादायी असल्याचे मतही यावेळी सातपुते यांनी व्यक्त केले. अध्यक्षीय समारोपात



राहुल केंद्रे यांनी आपल्या राजकीय वाटचालीत पत्रकारांचे मोठे योगदान असल्याचे सांगितले. स्व. लक्ष्मीकांत हलकीकर यांनी समाजाचे कल्याण करण्याचा हेतू समोर ठेवून पत्रकारिता केली असल्याचे सांगून बस्वराज पैके यांच्या कार्याचाही त्यांनी गौरव केला. कोरोना काळात पैके यांनी केलेले कार्य मोठे उल्लेखनीय असल्याचे केंद्रे म्हणाले. जिल्हा परिषदेचा अध्यक्षपदाच्या कारकिर्दीत आपण दिव्यांगाच्या विकासासाठी केलेल्या कामाचा आलेखही यावेळी राहुल केंद्रे यांनी मांडला. पुरस्काराला उत्तर देताना बस्वराज पैके यांनी आपण भोगत असलेला त्रास इतरांना होऊ नये म्हणून मी दिव्यांगाच्या क्षेत्रात काम करीत आहे, आज उदगीर मध्ये मिळालेला पुरस्कार आपल्याला पुढील कामासाठी अधिक ऊर्जा देणारा असल्याचे मतही यावेळी पैके यांनी व्यक्त केले. यावेळी शहरातील विविध सामाजिक संस्थेचा स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. यात जिव्हाळा ग्रुप, श्री नवयुवक व्यापारी गणेश मंडळ, श्रीमंत व्यापारी गणेश मंडळ, चला कवितेच्या बनात, पर्यावरण शिक्षण केंद्र एकुरका रोड, साहित्यिक सखी ग्रुप उदगीर, संस्कार भारती शाखा उदगीर, सायकलिंग ग्रुप उदगीर, जिवलग फाउंडेशन निलंगा, स्वराज सेवाभावी संस्था निलंगा, राधाकृष्ण फाउंडेशन निलंगा या सामाजिक संस्थांचा व गोमातेची सेवा करणारे मोहमद इसाक, बॅडमिंटन खेळात देशपातळीवर उदगीर चे नावलौकिक वाढविणारा नागेश भरत चामले, दिल्ली येथे पार पडलेल्या छात्र संसदेत आपली छाप पाडणारी उदगिरची लेक प्राजक्ता भांगे यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते बस्वराज पैके यांना शाल, स्मृतिचिन्ह, मानपत्र व रोख पाच हजार रुपये देऊन स्व. लक्ष्मीकांत हलकीकर स्मृती सेवागौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मानपत्राचे वाचन अनुराधा धोंड यांनी केले. सूत्रसंचालन अश्विनी देशमुख यांनी केले तर आभार प्रदर्शन विक्रम हलकीकर यांनी मानले. या कार्यक्रमास सामाजिक, राजकीय, साहित्य, शिक्षण, सांस्कृतिक,पत्रकार अशा विविध क्षेत्रातील मान्यवर मोठया संख्येने उपस्थित होते.

# चैतन्य विद्यालयाचे भाऊसाहेब खाडे यांना जिल्हास्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**ओतूर । मयूर ढोबळे**

येथील ग्राम विकास मंडळाच्या चैतन्य विद्यालयश्रमधील इंग्रजी आणि स्पर्धा परीक्षा विभागाचे प्रमुख , जुन्नर तालुका शिक्षक लोकशाही आघाडीचे उपाध्यक्ष भाऊसाहेब खाडे यांना नुकताच राजगुरुनगर येथे जिल्हास्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार प्रदान केला गेल्याची माहिती पुणे जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाचे कार्यवाह पंकज घोलप यांनी दिली.



पुणे जिल्हा माध्यमिक शिक्षक संघ, पुणे जिल्हा शिक्षक लोकशाही आघाडी, माध्यमिक शिक्षिका संघ यांचे विद्यमाने माजी शिक्षक आमदार स्वर्गीय शिवाजीराव बेंडे पाटील यांच्या स्मृती प्रित्यर्थ राजगुरुनगर येथे एका शानदार समारंभात जिल्ह्यातील १६ शिक्षकांना जिल्हास्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्काराने गौरवले गेले. श्री भाऊसाहेब खाडे यांनी शैक्षणिक क्षेत्रात तसेच सामाजिक क्षेत्रात आणि संघटने करता केलेल्या कामाबद्दल त्यांची जुन्नर तालुक्यातून या पुरस्काराकरिता निवड झाली. खाडे गेली एकतीस वर्षे चैतन्य विद्यालयात इंग्रजी आणि इतिहास विषयाचे अध्यापन करत आहेत. जुन्नर तालुका महाराष्ट्र प्रज्ञाशोध परीक्षेचे तालुका समन्वयक म्हणूनही ते गेली २५ वर्षे काम करीत आहेत.एक विद्यार्थी प्रिय शिक्षक म्हणून त्यांना ओळखले जाते.सामाजिक क्षेत्रात सुद्धा ते प्रत्येकाच्या सुखदुःखात नेहमीच सहभागी होत असतात. तालुक्यातील प्रसिद्ध सूत्र संचालक-निवेदक म्हणूनही त्यांना ओळखले जाते.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी नाशिक विभागाचे माजी शिक्षक आमदार नानासाहेब बोरस्ते होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून खेडचे विद्यमान आमदार दिलीप मोहिते, माजी आमदार पोपटराव गावडे, रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष माजी आमदार रामभाऊ कांडगे, शिक्षणाधिकारी डॉ.भाऊसाहेब कारेकर, महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे अध्यक्ष के. एस.ढोमसे, टी.डी.एफ. चे राज्याचे कार्याध्यक्ष जी .के. थोरात, कार्यवाह हिरालाल पगडाल, वसंतराव ताकवले, शिवाजीराव कामथे, सचिन दुर्गाडे , पंकज घोलप, प्रदीप गाढवे,तानाजी झेंडे, रमेश ढोमसे, रवींद्र डुंबरे,राजेंद्र सुतार,विजय घोलप,भाऊसाहेब शिंदे,प्रशांत घुले, हनीफ शेख, जगन्नाथ गाढवे,सविता ताजणे, जयश्री चौधरी,मीरा डुंबरे, प्रतीक अकोलकर, अनिल उकिरडे, अजित डांगे, रतिलाल बागुल,पांडुरंग मुंजाळ,आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रस्ताविक वसंतराव ताकवले तर सूत्रसंचालन मुरलीधर मांजरे यांनी केले. दिलीप ढमाले यांनी आभार मानले. त्यांच्या या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष अनिल तांबे, प्रभाकर तांबे, राजेंद्र डुंबरे, रघुनाथ तांबे, गावातील विविध संस्थांचे पदाधिकारी यांनी त्यांचेअभिनंदन केले आहे.

# पवनसुत निवासस्थानी नागरिकांनी केली तुफान गर्दी



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**केज । अमोल सावंत**

आठवडाभरानंतर खासदार बजरंग सोनवणे हे जिल्ह्यात दाखल होताच त्यांच्या केज येथील पवनसुत निवास्थानी नागरिकांनी प्रचंड गर्दी केली. तर त्यांनी नागरिकांच्या अडचणी जाणून घेत प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली आहे. त्यामुळे प्रचारात त्यांनी एक खासदार काय असतो ? हे दाखवून देऊ अशी ग्वाही दिली. त्याची प्रचिती यावरून दिसून येत आहे.

बीड जिल्ह्याचा खासदार म्हणून निवडून आल्यानंतर बजरंग सोनवणे यांनी दुसऱ्या दिवशी पक्षाचे अध्यक्ष जाणते राजे खा. शरदचंद्र पवार यांची भेट घेतली. त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ते मुंबई येथे गेले होते. त्यानंतर ते वरिष्ठांच्या आदेशानुसार मुंबई येथेच होते. सोमवारी पक्षाच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने अहिल्यानगर येथे आयोजित कार्यक्रमाला त्यांची मुख्य उपस्थिती होती. यावेळी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आपला फेटा बजरंग सोनवणे यांना घालत जायंट किलर असा उल्लेखही केला. तर बजरंग सोनवणे यांनी आपल्या भाषणात आपण आगामी विधानसभेसाठी मराठवाड्यात मोठी मोर्चेबांधणी करू व यश मिळवून देऊ असा विश्वास व्यक्त केला.आठवडाभरानंतर खा. बजरंग सोनवणे हे केजमध्ये पोहचले. मंगळवारी सकाळपासूनच त्यांच्या पवनसुत या निवासस्थानी नागरिकांची प्रचंड गर्दी जमली होती. ॲक्शन मोडवर असलेल्या सोनवणेंनी आलेल्या नागरिकांनी अडचणी ऐकून घेत त्या सोडवण्यासाठी अनेक अधिकारी वर्गांना फोन करीत त्या समस्या सोडवण्याच्या सूचनाही केल्या. आपली अडचण समजून घेत प्रशासकीय अधिकाऱ्यांशी बाप्पानी संपर्क केल्यामुळे नागरिकांच्या चेहऱ्यावर समाधान दिसत होते.

# सामाजिक कार्यकर्ता विनोद दोंदल यांना समाज भुषण व पर्यावरण मित्र पुरस्काराने सन्मानित

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**यवतमाळ । सय्यद रहीम रजा**

सामाजिक कार्यकर्ते, विनोद दोंदल यांचा पर्यावरणाचा व निसर्गाप्रती करत असलेल्या सामाजिक कार्याचा समाज भूषण व पर्यावरण मित्र म्हणून सत्कार करण्यात आला.चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर (बल्लारशा) येथे एकदंत सभागृहात दि.९ जून ला नुकत्याच संपन्न झालेल्या पर्यावरण संवर्धन व विकास समिती महाराष्ट्र राज्य व महाराष्ट्र नियंत्रण मंडळ चंद्रपूर यांच्या वतीने भव्य राज्यस्तरीय पर्यावरण संम्मेलन २०२४ पार पाडण्यात आला, या कार्यक्रमात सामाजिक व पर्यावरण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तीचा सत्कार व सन्मान करण्यात आले.



या सन्मान सोहळ्यात सम्मेलनाचे उद्घाटक मा. सुधाकरजी अडबाले शिक्षक आमदार नागपूर कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. डी. के. आरीकर अध्यक्ष प. स. व वि. स, सहउद्घाटक सुभाषभाऊ धोटे आमदार राजुरा , विशेष अतिथी किशोरभाऊ जोरगेवार आमदार, चंद्रपूर,चंदनसिंह चंदेल वनविकास माजी अध्यक्ष, कार्यक्रम संयोजक सुधीर कोरडे, गुणेश्वर आरीकर अध्यक्ष, खै. कु. स. विदर्भ प्रदेश, हरिशजी शर्मा, संतोषभाऊ रावत, ॲड. वैशाली टोंगे, डॉ. रजनीताई हजारे, घनश्याम मुलचंदानी, डॉ. अभिलाषा गावतुरे, विनोद सातपुते, सुरेखा रडके, वनविकास तानाजी यादव, उमाशंकर भादुले, गिरीश कुमरवार, प्रमुख वक्ते प्रा. डॉ. टी. डी. कोसे नितीन तुमडे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

विनोद दोंदल यांनी पर्यावरण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य जसे वृक्षारोपण करणे, मुलांना आपल्या जीवनातील वृक्षाचे महत्त्व पटवून देणे, ओसाड पडलेल्या जगलात फेकण्यासाठी सीडबॉल तयार करणे व सीडबॉल तयार करण्याची कार्यशाळा घेणे, गरजवंत, बिमार व्यक्तींनं मदत करणे, प्लास्टिक निर्मूलनात सहकार्य करणे, उन्हाळ्यात पशुपक्ष्यांसाठी पाणी पुरवठे तय्यार करणे, असेच एक ना अनेक सामाजिक कार्यात उपस्थित राहून स्वहस्ते उल्लेखनीय योगदान दिल्या बद्दल विनोद दोंदल यांचा आयोजन समिती पर्यावरण संवर्धन व विकास समिती महाराष्ट्र राज्य यांच्या कडून मानचिन्ह (ट्रॉफी) व सन्मानपत्र आणि वृक्ष देऊन समाज भूषण, पर्यावरण मित्र पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आले, हया कार्यक्रमात सर्व महाराष्ट्रातील पर्यावरणावर व सामाजिक क्षेत्रात चागले कार्य करणारे असंख्य समाज सेवक उपस्थित होते, विनोद दोंदल यांनी हा मिळालेला पुरस्कार कोण्या एकट्याचा नसून आपल्या सोबत खांद्याला खांदा लावून सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या सर्वांचा आहे असे सांगीतले.

# गटविकास अधिकारी यांना अरूण कदम यांचे निवेदन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

मा.गटविकास अधिकारी साहेब, पंचायत समित,आष्टी ता.आष्टी जि.बीड ९०/१० अतर्गत खाजगी जागेत शासकीय ब्लॉक ग्रामपंचायत वाळूज अंतर्गत बसविले बाबत म्हणून अरूण भगवान कदम रा.पारगाव (जो ता.आष्टी जि.बीड मौजे बाळूज हदीत गट नं. २८७ मधील ० हे १५ आर जमिनीमध्ये ९०/१० अंतर्गत वाळूज ग्रामपंचायतीने बेकायदेशिर रित्या ब्लॉक बसविले आहेत.आम्ही येथे कोणीही राहण्यासाठी नसल्याने व आम्ही पुणे येथे वास्तव्यात आहोत सदरील जमिन ही आमचे वडील भगवान यशवंता कदम यांच्या मालकीची असुन ते मयत आहेत.वरील जमिन ही समाईक असुन भाऊहिस्से वाटण्या



अद्यापपर्यंत आलेल्या नाहीत.सदरील ब्लॉक बसविले आहेत त्यासाठी आम्हा कोणाचीही सम्मती अगर दानपत्र घेतलेले नाही.तसेच सदरील जमिन आम्हाला पेरण्यायोग्य पाऊस झाल्यामुळे मोकळी करून देण्यात यावी तरी वरील गट नं.२८७ मधील ० हे १५ आर क्षेत्रावर ग्रामपंचायत वाळूज यांनी अतिक्रमण करून पेव्हर ब्लॉक बसविण्यात आलेले आहेत.तसेच सदरील कामाचे मस्टर ग्राम रोजगार सेवक याने बोगस भरण्यात आलेले आहेत सदरील काही लोक मौजे वाळूज येथील रहिवासीसुध्दा नाहीत.तसेच ते या ठिकाणी वास्तव्यास नाहीत.सदरील लोक हे बाहेरगावी नामांकीत कंपनीत उच्चपदावर कार्यरत आहेत.तरी मे.साहेबांनी वरील सर्व प्रकरणाची सखोल चौकशी जे बील मस्टरद्वारे देण्यात आलेले आहे त्याची रिकव्हरी करून सबंधीत ग्रामपंचायत वाळूज चे जे संबंधित अधिकारी दोषी असतील यांच्यावर निलंबनाची त्वरीत कार्यवाही करण्यात यावी अशी अरूण भगवान कदम रा.पारगांव (जो.) ता.आष्टी जि. बीड यांनी निवेदन व्दारे केली आहे.

# माहोरा परिसरात वादळी वारा आणि विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**महोरा । प्रतिनिधी**

सविस्तर वृत्त असे की, माहोरा परिसरात शुक्रवार दिनांक ०७ रोजी संध्याकाळी सात आठ वाजताच्या सुमारास अचानक मोठ्या प्रमाणत वादळी वारा सुरू झाला आणि वाऱ्यासह पाऊस ही सुरू झाला. वारा एवढा जोरात होता की, वालसा,वडाळा, कोल्हापूर



या गावातील काही शेतकऱ्यांच्या घरावरील, जनावरांच्या गोठ्यावरील पत्रे अक्षरशः पत्रवाळी सारखे उडून गेले. पाऊस चालु असतांना घरातील अन्न धान्य सुध्दा भिजून गेली. वडाळा येथील चार ते पाच भावंडांच्या घरावरील पत्रे उडून गेली. तसेच शेतकऱ्यांच्या जनावरांच्या गोठ्यावरील पत्रे उडून गेल्यामुळे शेतकऱ्यांचे फार मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. काही शेतकऱ्यांच्या शेत तळ्यातील ताडपट्टी सुध्दा उडून गेलेले आहेत. त्यामुळे तहसीलदार साहेबांनी त्वरीत पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक सहकार्य करावे अशी मागणी जाफराबाद तालुक्यातील शेतकऱ्यांनी मागणी केली आहे.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४
This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904